# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB/49/2025

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक २१/०८/२०२५

.............................................................................................................................................

**''वेश्याव्यवसायातुन ०९ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

.............................................................................................................................................

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री.पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २०/०८/२०२५ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत ''व्दारका रेसिडन्सी, से १९/सी, एपीएमसी, नवी मुंबई येथे लॉज मॅनेजर हा वेश्यागमनासाठी मुली व महिला चे मोबाईल मधील फोटो ग्राहकास दाखवुन ग्राहकाने मुलगी पसंद केल्यानंतर ग्राहकाडुन वेश्यागमनाचे ४०००/- रू घेत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली होती.'' त्याबाबत खात्री करून कारवाई केली.

वपोनि/घोरपडे यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास व्दारका रेसिडन्सी, प्लॉट नंबर १०, से १९/सी, एपीएमसी, नवी मुंबई येथे पाठवले असता बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून पोलीस पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०४ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मधील आरोपी कमांक १) मॅनेजर- मोहम्मद मुनातुल्ला अमिरहुसेन शेख उर्फ बबलु, वय २९ वर्षे, रा. व्दारका रेसिडन्सी, मुळ रा. ग्राम जलई पुनरवास, पोस्ट मनव्वर, थाना जलई, सारसा, बिहार. आरोपी कमांक २) मॅनेजर- मोहम्मद वकील मकसुद शेख, वय ४३ वर्षे, रा. व्दारका हॉटेल, मुळ रा. लिलजा, तेलवा, मैसी, साहरसा, बिहार यांनी नमुद ०४ पिडीत यांना पाहिजे आरोपी अब्दुल तरफदार व राजु बंगाली यांच्या कडुन प्राप्त करून नमुद मुलीना ग्राहकांस दाखवुन, त्याचा वेश्यागमनाचा मोबादला आरोपी कमांक ०१ यांने ४०००/- रू स्वीकारला. तसेच आरोपी कमांक ०३) रूम बॉय- नजरूल आलमउददीन इस्लाम शेख, वय ३० वर्षे, रा. व्दारका रेसिडन्सी, मुळ रा. जारवणी, पोस्ट फुलतली बाजार, थाना लोंका, हुरजाई, आसाम यांने बनावट ग्राहकास कंडोम पुरवला. आरोपी कमांक ०४) रिक्षा चालक- विकास भुवनेश्वर भुनिया, वय ३५ वर्षे, धंदा रिक्षा चालक, रा. घर नंबर १९२, रूम नंबर १०३, जुहुगांव, सेक्टर ११, नवी मुंबई, मुळ रा. जुगुडी, इटश्वोरी, चतरा, झारखंड यांने नमुद पिडीत महिलांना पाहिजे आरोपी अब्दुल तरफदार व राजु बंगाली यांच्या से १२, कोपरखैरणे येथील रूम मधुन व्दारका लॉज पर्यत वेश्याव्यवसायाठी आणले.

त्यानंतर नमुद ०४ पिडीत महिलांनी, पाहिजे आरोपी अब्दुल तरफदार व राजु बंगाली यांनी से १२, कोपरखैरणे येथे एका रूम मध्ये त्याच्यासह अजुनही इतर महिलांना वेश्याव्यवसायाकरीता ठेवल्याचे सांगितल्याने. सदर रूम मधुन ०५ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली व त्या ठिकाणी रूमचा मॅनेजर म्हणुन काम पाहणारा आरोपी कमांक ०५) रूम मॅनेजर- जहागिर अब्ररअली मोल्ला, वय ३४ वर्षे, धंदा रूम मॅनेजर, रा. संचयीता प्लॉट नं.२३ बी से.नं.१२ कोपखैरणे नवी मुंबई, मुळ रा. पं बगाल व त्यांना वेश्याव्यवसायासाठी हव्या त्या ठिकाणी रिक्षाने सोडणारा आरोपी कमांक ०६) सिताराम रामदास यादव, वय ४५ वर्षे, धंदा रिक्षा चालक, रा. रूम नंबर ३३१, गरीब नवाज मज्जीद, जवळ, केके आर रोड, तुर्भे

स्टोअर, नवी मुंबई, मुळ रा. उत्तर प्रदेश यांना संचयीता प्लॉट नं.२३ बी से.नं.१२ कोपरखैरणे, नवी मुंबई येथुन ताब्यात घेण्यात आले.

सदर वेश्याव्यवसायाकरीता व्दारका लॉज चालवण्यासाठी देणारा पाहिजे आरोपी कमांक ०७) सुधाकर आण्णाया पालन, पुर्ण पत्ता माहित नाही, मो ९६९९०६०९८६, ०९ पिडीत महिलांना प्राप्त करणारे दलाल पाहिजे आरोपी कमांक ०८) अब्दुल तरफदार, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही. मो ८४५२०८५१६७ व पाहिजे आरोपी कमांक ०९) राजु बंगाली, पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी आपसात संगणमत करून, त्यांचा अनैतिक मानवी व्यापारासाठी वापर करून, त्यांच्या कमाईवर उपजिविका करत असताना मिळुन आले म्हणुन त्यांच्या विरूध्द गु.रजि.नं. ५३०/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३, कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास एपीएमसी पोलीस ठाणे करत आहे.

**सदर गुन्हयात ०६ आरोपी यांना दिनांक २१/०८/२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक २५/०८/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे.**

सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/अलका पाटील, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, मपोहवा/२५०१ अडकमोल, मपोहवा/२५०४ म्हात्रे, मपोना/२९८४ भोये, चालक पोहवा/हान्डे यांनी केली आहे.

★★★★★★★★★★




★★★★★★★★★★